MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

SPECIAL ISSUE January 2019

# स्थानिक इतिहास लेखन

■ अतिथि संपादक ■

**डॉ. इंद्रजित भाऊराव जाधव**
प्राचार्य
बी.डी. काळे महाविद्यालय घोडेगाव (पुणे)

**डॉ. नाथा रामभाऊ मोकाटे**
इतिहास विभाग प्रमुख
बी.डी. काळे महाविद्यालय घोडेगाव (पुणे)



12) संत बहिणाबाईंचे माहेर : देवगाव (रंगारी)
प्रा डॉ. कृष्णा मालकर || 41

13) उरुळी कांचन मधील निसर्गोपचार आश्रमाचा इतिहास
प्रा. अमोल पोपट बोत्रे || 45

14) पश्चिम महाराष्ट्रातील नागरी भागातील दलित महिलांचा राजकीय दर्जा...
डॉ. बाळासाहेब निवृत्ती कर्पे || 47

15) आदिवासी तारणहार सावकारशाहीचा कर्दनकाळ होन्या केंगले...
प्रा.संपत मारूती ब्रम्हांडे || 50

16) श्री गणेश मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास
प्रा. डॉ. गोर्डे विलास सोमा || 53

17) नांदेड जिल्ह्यातील खाकेश्वर मठसंस्थान, कासराळी
प्रा. डॉ. सोमनाथ लक्ष्मण गुंजकर || 57

18) थापलिंग व धामणीचा खंडोबा
प्रा.बी.के.सांगळे, डॉ.जाधव संतोष हनुमंत || 59

19) जंजिरा संस्थानचे विलीनीकरण एक ऐतिहासिक घटना
प्रा. डॉ. जाधव बबन भिवसेन || 62

20) भुलेश्वर मंदिराचे स्थापत्य व रचना
डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव || 67

21) प्रादेशिक इतिहास संशोधन सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास
प्रा.चांगुणा विठठ्ल कदम || 70

22) पळशी गावातील वाडे व मंदीरे
प्रा. काकडे बी. जे. || 72

23) राहाता तालुक्यातील गोगलगावचा इतिहास
महेश वसंत कुलकर्णी || 75

https://sites.google.com/site/vidyawartajournal _ http://www.vidyawarta.blogspot.com

**18**

# थापलिंग व धामणीचा खंडोबा (ता. आंबेगाव, जि. पुणे)


**प्रा.बी.के.सांगळे**
इतिहास विभागप्रमुख
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर

**डॉ.जाधव संतोष हनुमंत**
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर
एम.ए.एम.फिल.नेट.सेट.पीएच्.डी.(इतिहास)
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर


**************

**प्रास्ताविक –**

महाराष्ट्राला संतांची परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्रातील जनता धार्मिक भावनेने आपले जीवन जगत आहे. ही धार्मिक भावना जपण्यासाठी लोकांची अनेक श्रध्दास्थाने ठरलेली आहेत. त्यापैकी दोन प्रसिध्द व लोकप्रिय देवस्थाने आहेत. ती म्हणजे वारकरी लोकांचा विठोबा व भाविक भक्तांचा खंडोबा ही श्रध्दास्थाने आहेत. खंडोबा हा शंकराचा अवतार आहे. खंडोबाची मुर्ती विठ्ठलाशी साधर्म्य राखणारी आहे. परंतु दोघांच्या लोकप्रियतेची, सांस्कृतिक प्रतिष्ठतेची पध्दत वेगळी आहे. विठोबाला आळविण्यासाठी भजन, fd r Ž o i øpulpkv oy a dþ I जातो. तर खंडोबाला प्रसन्न करण्यासाठी तळी भांडार व जागरण गोंधळ करण्याची पध्दत आहे.

**संशोधनपध्दती :**

शोधनिबंधाची मांडणी करताना ऐतिहासिक संशोधन पध्दती वापरली आहे. पूर्वीच्या काळी इतिहास हा राजा व राजघराणी केंद्रीत होता. आधुनिक काळात त्याची व्याप्ती वाढली आहे. इतिहासलेखनात राष्ट्रीय व प्रादेशिक इतिहासलेखनाप्रमाणेच स्थानिक इतिहासलेखन केले जाते. त्यामुळे एखाद्या शहराचा, गावाचा वा धार्मिक तिर्थक्षेत्राचाही इतिहास लिहीता येतो. म्हणूनच या शोधनिबंधासाठी थापलिंग व धामणी येथील खंडोबा या कुलदैवतांचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे. शोधनिबंध लिहीताना संदर्भग्रंथ, क्षेत्रभेट, वर्तमानपत्र, मुलाखत या साधनांचा वापर केला आहे.

**भगवंत प्राप्तीमार्ग –**

आपल्या धर्मशास्त्राने भगवंत प्राप्तीसाठी तीन मार्ग सांगितले आहेत. योगमार्ग, कर्ममार्ग व भक्तीमार्ग. सामान्य माणसाला भक्तीमार्ग अतिशय सोपा आहे. कारण या मार्गात वेळेचे बंधन नाही. मनापासून प्रेमभावनेने कुलदैवताची सेवा केल्यास आयुष्यात काहीच कमी पडत नाही. अत्याचार, अहंकार, अनिती व असुरी वृत्तींचा वध करणारा म्हणून खंडोबाची ख्याती आहे. कुलदैवत म्हणजे रूढी परंपरेनुसार घराण्याची जी विशिष्ट कुलदेवता आहे तिची उपासना करणे यास कुलधर्म म्हणतात. कुल म्हणजे वंश याचाच अर्थ घराणे असाही होतो. धर्म म्हणजे कर्तव्य पार पाडणे होय. धार्मिक विधी पालनाविषयी संत तुकारामांनी एका अभंगात वर्णन केले आहे.

'तुका म्हणे दावी देव।
यथाविध भाव जरी देव ।।

म्हणजेच कुलाचार पाळण्यासाठी धार्मिक विधीचे पालन करणे आवश्यक आहे.

जेजुरी, पाली, कोलथन, नळदुर्ग, मंगसुळी, सातारे, मैलारसिंग, देवरगड, निमगाव (दावडी), थापलिंग, धामणी ह्या महत्त्वाच्या ठिकाणी यात्रा भरते.[१] महाराष्ट्रातील व्यक्ती कुलाचार सांभाळण्यासाठी पौर्णिमा, चंपाषष्ठी यात्रा उत्सवासाठी आवर्जून कुलदैवतचरणी नतमस्तक होतात. आंबेगाव तालुक्यातील थापलिंग व धामणी येथील देवस्थानांच्या ठिकाणी मोठी यात्रा भरते.

**थापलिंग –**

आंबेगाव तालुक्यातील मंचर – नाशिक हायवेच्या पूर्वेस १२ कि.मी. अंतरावर नागापूर गावच्या शिवारात हे देवस्थान आहे. खेड, आंबेगाव, जुन्नर, पारनेर तालुक्यातील भाविक येथे यात्रेसाठी येतात. याठिकाणची यात्रा तीन दिवस चालते. पुणे जिल्ह्यातील लोकांची ही यात्रा विशेष आकर्षण असते. थापलिंग येथील देवस्थान नागापूर शेजारी असणाऱ्या डोंगरावर गुराखी मुले गलीमध्ये कवड्यांचा खेळ खेळत होते.

त्यातील एका गल्लीतून भंडारा निघाला. ही घटना मुलांनी ग्रामस्थांना सांगितली. ग्रामस्थांनी त्याठिकाणी जाऊन खणण्यास सुरूवात केली. त्यावेळी तेथे लिंग आढळले, लिंग म्हणजे शंकराची खुण व भंडारा उधळला म्हणून खंडोबा. म्हणजेच खंडोबा हा शंकराचा अवतार शंकराच्या लिंगाची स्थापना केली. म्हणूनच त्या देवास थापलिंग असे नाव पडले.[२] अशी आख्यायिका या परिसरात प्रचलित आहे. तेव्हापासून ग्रामस्थांनी दरवर्षी यात्रा भरविण्यास प्रारंभ केला. त्यानंतर काही दिवसांनी थापलिंगच्या समोरच स्वयंभू पंचलिंग आल्याचे सांगतात. याच मंदिरात ग्रामस्थांनी खंडोबा, म्हाळसा, बाणू व त्यांची एक दासी (शिंपीण) यांच्या मुर्ती प्रतिष्ठापना केली आहे. थापलिंगचे मंदिर होळकरांच्या जहागिरीत येत होते. अहिल्याबाई होळकर यांनी मंदिराचा जीर्णोध्दार केला होता. १९५१ मध्ये मंदिरात फरशी बसवली. अलिकडच्या काळात थापलिंग मंदिर विश्वस्त समिती व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मंदिराचा जीर्णोध्दार केला.[३] मंदिराभोवती तटबंदी बांधून आतील बाजूस ब्लॉक बसवून प्रदक्षिणा मार्ग तयार करण्यात आला आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्याचे काम विश्वस्त करत आहेत. मंदिर परिसरात वृक्षारोपन केले आहे. त्यामुळे देवस्थानाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना पर्यावरण रक्षणाचा संदेश मिळतो आहे.

**थापलिंगची पूजा व यात्रा :**

खेड, आंबेगाव, जुन्नर परिसरातील जागृत देवस्थान, नवसाला पावणारा देव म्हणून भाविकांचे श्रध्दास्थान म्हणजे थापलिंग देवस्थानाची ख्याती आहे. या देवस्थानाची पूजा नित्यनियमाने केली जाते. देवस्थानाची पूजा व आरतीचे काम गुरव समाजाकडे आहे. दररोज सकाळी सात वाजता व संध्याकाळी सहा वाजता पूजा व आरती केली जाते. दर रविवारी भाविक थापलिंगला दर्शनासाठी येतात. त्यापैकी काहीजण तळीभांडार उधळून सेवा करतात. दर सोमवती अमावस्या व पौर्णिमेला देवाच्या पालखीची मिरवणूक काढून ती स्नानासाठी मीना नदीला नेली जाते. त्यावेळी ग्रामस्थ व परिसरातील लोक मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.

थापलिंग देवस्थानाची यात्रा दर पौष पौर्णिमेला भरते. यात्रा तीन दिवस चालू असते. आंबेगाव तालुक्यातील व्यवसाय व नोकरीनिमीत्त बाहेर गेलेले आहेत. काहीजण तिकडेच कायमचे रहिवासी झाले आहेत. ते सर्वजण व कोकण, नगर, सातारा व संपूर्ण पुणे जिल्ह्यातून लोक येतात. यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे आंबेगाव तालुक्याच्या पूर्वभागात असणारी रांजणी, नागापूर, शिंगवे, पारगाव, भराडी, जवळे, पारगाव, थोरांदळे या परिसरातील लोकांना ही यात्रा म्हणजे पर्वणीच असते. कारण कुटुंबात आवश्यक असणाऱ्या सुई — दोरा या वस्तूंपासून शेतीसाठी आवश्यक असणारी सर्व अवजारे यात्रेत विक्रीसाठी येत होती. अलीकडच्या काळात दळणवळणाची सोयी उपलब्ध झाल्या असल्या तरी अनेक अल्पभूधारक शेतकरी व इतर शेतकऱ्यांना काही विशिष्ट वस्तू खरेदीसाठी या यात्रेची वाट पहावी लागते. यात्रेमुळे लोकांना जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे सोयीचे होते. दुसरं वैशिष्ट्ये म्हणजे खेड, आंबेगाव, जुन्नर परिसरात बैलगाडा शर्यत हा लोकप्रिय खेळ आहे. त्यासाठी प्रत्येक यात्रेत लाखो रूपयांची बक्षीसे वाटली जातात. मात्र थापलिंग देवस्थानाच्या यात्रेत बैलगाडे कोणत्याही प्रकारचा इनाम नसताना केवळ नवस म्हणून बैलगाडे पळविले जातात. ही स्पर्धा अतिशय शिस्तीने पार पाडली जाते. या यात्रेनंतर या परिसरातील यात्रा व बैलगाडा स्पर्धांची सुरूवात gkss[४]

खंडोबा देवस्थानाच्या भक्तीमध्ये जागरण हा महत्त्वाचा घटक आहे.यात्रेच्या काळात परंपरेनुसार मंदिर परिसरात नवसाची जागरणे घातली जातात. असंख्य भाविक येळकोट, येळकोट जय मल्हार, आंबाबाईचा उधे, उधे या जयघोषात भंडार खोबऱ्याची मोठ्या मनोभावे उधळण करतात. असे हे भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारे महत्त्वपूर्ण देवस्थान मानले जाते.[५]

**धामणीचा कुलस्वामी म्हाळसाकांत —**

धामणी हे ठिकाण पुणे — नगर महामार्गावर असणाऱ्या शिक्रापूरच्या पश्चिमेस शिक्रापूर — मंचर रस्त्यावर १० कि. मी. अंतरावर आहे. आंबेगाव तालुक्यातील लोकांचे हे दुसरे खंडोबाचे देवस्थान आहे. महाराष्ट्र शासनाने नुकताच या देवस्थानास तिर्थक्षेत्राचा दर्जा दिला आहे.[६] खंडोबा हे महाराष्ट्रातील लोकांचे

कुलदैवत आहे. धामणी परिसरातील तळेगाव (ढमढेरे), जातेगाव (पारनेर,) मांजरवाडी (जुन्नर), गावडेवाडी, महाळुंगे पडवळ, लांडेवाडी, मंगरूळ पारगाव इ. २० गावांचे हे कुलदैवत आहे. सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांच्या नवसाला पावणारे कुलस्वामी म्हाळसाकांत जनतेचे श्रध्दास्थान बनले आहे.[७]

**कुलस्वामी म्हाळसाकांतची यात्रा :**

धामणी येथील खंडोबाची यात्रा ग्रामस्थ व भाविकांकडून दरवर्षी भरवली जाते. ही यात्रा चंपाषष्ठीला भरते. चंपाषष्ठी हा कुलस्वामी खंडेरायाचा जन्मदिवस असल्याने तो दिवस अतिशय पवित्र मानला जातो. चंपाषष्ठी दिवसाच्या महत्त्वाबाबत अशी पुराणकथा सांगितली जाते की, मनी आणि मल्यासूर या दोन दैत्यांनी ब्रह्मदेवाची तपश्चर्या केली. ब्रह्मदेव देव प्रसन्न झाले असता त्यांनी आम्हास पृथ्वीतलावरील सर्व राज्य पाहिजे असे वरदान मागितले व आम्ही राज्य करताना आम्हास कोणीही जिंकू नये अशी अमरकाया मागितली. यावर ब्रह्मदेवाने त्यांची इच्छा पूर्ण केली. मनी आणि मल्य या दैत्यांनी काही काळ पृथ्वीतलावर अतिशय चांगले राज्य केले. परंतु कालांतराने त्यांचा अहंकार वाढला आणि गर्विष्ठ दैत्यांनी पृथ्वीतलावर हाहाकार माजविण्यास सुरूवात केली. होमहवन बंद करणे, ऋषीमुनींचा छळ करणे असे प्रकार सुरू केले. तेव्हा ऋषीमुनींनी ब्रह्मदेवाकडे धाव घेतली. ब्रह्मदेवाने ऋषीमुनींना शिवशंकर महादेवाची उपासना करावयास सांगितले. ऋषीमुनींनी हा सर्वप्रकार महादेवास सांगितला. महादेवाने मनी आणि मल्यासूरास बोलावून घेतले परंतु त्यांनी महादेवास जुमानले नाही. तेव्हा महादेव व दैत्य यांच्यात युध्द झाले. या युध्दात दैत्यांचे रक्त जमीनीवर सांडले की त्यापासून असंख्य दैत्य निर्माण होऊ लागले. त्यावेळी पार्वतीने शंकरास दैत्याचा नाश करण्यासाठी आपणास अवतार घ्यावा लागेल असे सांगितले. त्यावेळी भगवान शिवशंकराने युध्द थांबविले. शिवशंकर पाल पेंबर वेळूचे वेत यात पाच दिवस गुप्त झाले. आणि सहाव्या दिवशी खंडोबाचा अवतार धारण केला. तो दिवस चंपाषष्ठीचा असल्यामुळे तो खंडेरायाचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो.[८] याच दिवशी श्रीक्षेत्र धामणी येथे फार मोठा उत्सव साजरा केला जातो. धामणी येथील मंदिरात खंडोबा म्हाळसा व बाणाईची पाषाणातील भव्य आकर्षक मुर्ती आहे. दर महिन्याच्या पौर्णिमेला देवाच्या मुखवट्याची पालखीतून ग्रामप्रदक्षिणा काढली जाते. धामणी देवस्थानाच्या ठिकाणी दरवर्षी माघ पौर्णिमेला यात्रा भरते. मंदिराचा जीर्णोध्दार करून रंगकाम केले आहे. शासकीय धार्मिक तिर्थक्षेत्र विकास निधी आणि धामणी येथील ग्रामस्थ व कुलदैवत असणारे भाविक यांच्याकडून या तीर्थक्षेत्राचा विकास होत आहे. हे इतिहास अभ्यासकांसाठी महत्त्वपूर्ण बाब आहे.

**निष्कर्ष –**

आधुनिक काळातही आपल्या समाजातील लोक कुलदैवतांची पुजा, प्रार्थना व यात्रांचे आयोजन मनोभावे करतात. कुलदैवतांच्या यात्रांमध्ये सर्व जातीधर्माती लोक सहभागी होतात. त्यामुळे सामाजिक सलोखा व एकात्मता टिकलेली आहे.


१. विशाल निवृत्ती करंडे (संपा.), **आंबेगाव माझा विशेषांक**, २०१५, पृ. ११.
२. नागापूर परिसरात प्रचलित असलेली आख्यायिका.
३. मुलाखत, **पंढरीनाथ सोपान शिंदे**, थापलिंग मंदिर गुरव, दि. २७/९/२०१५.
४. मुलाखत, **निलेश टेमकर**, बैलगाडा मालक, दि. ०२/०५/२०१४.
५. थापलिंग मंदिरास यात्रेदिवशी प्रत्यक्ष भेट.
६. **दैनिक सकाळ**, पुणे जिल्हा, गुरूवार दि. ३ जून, २०१०, पृ. २.
७. विशाल निवृत्ती करंडे (संपा.)**आंबेगाव माझा विशेषांक**, २०१५. पृ. ११.
८. खंडोबा जन्माविषयीची पुराणकथा.


❑❑❑